**भारत-संयुक्त राष्ट्र जागतिक क्षमता निर्माण उपक्रमाअंतर्गत प्रकल्पांना प्रारंभ**

02 ऑगस्ट 2025

"भारत संयुक्त राष्ट्र जागतिक क्षमता निर्माण उपक्रम" अंतर्गत पहिल्या चार प्रकल्पांचा प्रारंभ 01 ऑगस्ट 2025 रोजी परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे सचिव (पश्चिम) श्री तन्मय लाल यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी प्रकल्प कार्यान्वित होणाऱ्या देशांचे मिशन प्रमुख, संयुक्त राष्ट्राचे निवासी समन्वयक श्री. शोम्बी शार्प, भारतातील विविध संयुक्त राष्ट्रांच्या संस्थांचे प्रमुख आणि परराष्ट्र मंत्रालयाचे वरिष्ठ अधिकारी या शुभारंभाच्या वेळी उपस्थित होते.

2. माननीय परराष्ट्र व्यवहार मंत्री डॉ. एस. जयशंकर यांच्या उपस्थितीत संयुक्त राष्ट्र महासभेच्या 78 व्या सत्राच्या पार्श्वभूमीवर सप्टेंबर 2023 मध्ये उपक्रमाची घोषणा करण्यात आली होती. त्यानंतर भारतातील परराष्ट्र व्यवहार मंत्रालय आणि संयुक्त राष्ट्र संघाने संयुक्तपणे SDG उद्दिष्टांना गती देण्यासाठी दक्षिण-दक्षिण सहकार्याला चालना देण्यासाठी प्रकल्पांची निश्चिती आणि त्यांची अंमलबजावणी करण्याचं काम हाती घेतलं.

3. ग्लोबल साउथच्या क्षमता बांधणीच्या प्रयत्नांमध्ये भारताची अग्रणी भूमिका राहिली आहे.  ITEC (इंडियन टेक्निकल अँड इकॉनॉमिक को-ऑपरेशन) हा त्यांचा प्रमुख कार्यक्रम आहे. ज्याअंतर्गत दरवर्षी जवळजवळ 160 देशांमध्ये 400 पेक्षा जास्त विशेष अभ्यासक्रमांमध्ये 12000 पेक्षा जास्त प्रशिक्षण स्लॉट प्रदान केले जातात. ज्यामध्ये प्रारंभापासून आतापर्यंत 225000 पेक्षा जास्त प्रशिक्षण स्लॉट उपलब्ध करण्यात आले आहेत.

4. भारत-संयुक्त राष्ट्र जागतिक ग्लोबल साउथ क्षमता बांधणी ही भारताच्या तांत्रिक आणि आर्थिक क्षेत्रातील क्षमता बांधणी कौशल्याचा एक नैसर्गिक विस्तार आहे. जो संयुक्त राष्ट्रांच्या यंत्रणांना समन्वित करुन संबंधित देशांमध्ये मागणी-चालित कार्यक्रमांची रचना करतो. ज्याचा उद्देश SDG उद्दिष्टे साध्य करण्यासाठी सकारात्मक परिणाम घडवून आणणाऱ्या क्षेत्रांमध्ये विशेष प्रशिक्षणाद्वारे त्यांच्या मानवी संसाधनांना पाठबळ देणं आहे. संयुक्त राष्ट्रसंघाची यंत्रणा यजमान सरकारला SDG केंद्रित प्रकल्प आणि अन्य पैलू ओळखण्यास मदत करेल. तर प्रशिक्षण घटकांची अंमलबजावणी भारत सरकारच्या ITEC कार्यक्रमाच्या मार्फत राबविली जाईल.

5. पहिल्या टप्प्यात एकूण चार प्रकल्प अंमलबजावणी साठी निश्चित करण्यात आले आहेत. ज्यामध्ये (अ) जागतिक अन्न कार्यक्रमाच्या सहकार्याने नेपाळमध्ये तांदूळ उत्पादन सक्षमीकरण आणि पुरवठा साखळी व्यवस्थापन (ब) UNDP च्या मदतीने झांबिया आणि लाओ पीडीआर साठी डिजिटल हेल्थ प्लॅटफॉर्म; (क) UN पॉप्युलेशन फंडच्या मदतीने बेलीझ, बार्बाडोस, सेंट किट्स आणि नेव्हीज, सुरीनाम

आणि त्रिनिदाद आणि टोबॅगोमध्ये जनगणनेची तयारी; आणि (ड) युनेस्कोच्या मदतीने दक्षिण सुदानसाठी व्यावसायिक प्रशिक्षण कार्यक्रम.  या प्रकल्पांसाठी, ITEC प्रशिक्षण संस्था निश्चित करण्यात आली आहे.  सप्टेंबर 2025 पासून अभ्यासक्रमांची अंमलबजावणी अपेक्षित आहे.

**नवी दिल्ली**

01 ऑगस्ट 2025